CNR No. MHRG040052672025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०४/११/२०२५ |
| नोंदणी तारीख | : | २४/११/२०२५ |
| निकाल तारीख | : | २४/०३/२०२६ |
| कालावधी | : | ०० व. ०४ म. २० दि. |

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल यांचे न्यायालयात, पनवेल,**
**जिल्हा - रायगड**
**(पिठासीन अधिकारी : ए.एस. बडगुजर)**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६१७/२०२५**
**निशाणी क्र.१३/ब**

**१. भारती कमल मोरारका**
वय- ७६ वर्षे, व्यवसाय- व्यापार,
रा. २४-बी, मोरारका हाऊस,
कारमाइकल रोड, खंबाला हिल,
मुंबई महाराष्ट्र ४०००२६

**२. समृध्दी जाटीया उर्फ समृध्दी कमल मोरारका**
वय- ५४ वर्षे, व्यवसाय- व्यापार,
रा. २४-बी, मोरारका हाऊस,
कारमाइकल रोड, खंबाला हिल,
मुंबई महाराष्ट्र ४०००२६

**३. प्रगती मुंध्रा उर्फ प्रगती कमल मोरारका**
वय- ५१ वर्षे, व्यवसाय -
रा. राघव दास मुंध्रा, द एमप्रायर,
सदनिका क्र.३ ए बी, टॉवर २, गुरूसदाय रोड,
भारत पेट्रोल पंपाजवळ, बालीगंज,
कोलकाता, पश्चिम बंगाल – ७०००१९ **... अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही **... सामनेवाले**

..........................................................................................
अर्जदारांतर्फे विधिज्ञ – प्रेमनाथ पुंडलिक लोभी.
..........................................................................................

**- न्यायनिर्णय -**
**(घोषित दिनांक २४/०३/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कमल महावीरप्रसाद मोरारका हे दिनांक १५/०१/२०२१ रोजी २४-बी, मोरारका हाऊस, कारमाईकल रोड, खंबाला हिल, मुंबई महाराष्ट्र ४०००२६ येथे मयत झाले. मयत कमल महावीरप्रसाद मोरारका यांची आई बेलाबाई महावीरप्रसाद मोरारका या दिनांक ०७/०३/१९८५ रोजी मयत झाल्या आहेत. मयत कमल महावीरप्रसाद मोरारका यांच्या पश्चात अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारस आहेत. मयत कमल महावीरप्रसाद मोरारका यांच्या मालकीच्या मौजे भिलवले, ता. खालापूर, जि. रायगड येथे सर्व्हे क्र.११५, हिस्सा क्र.१, सर्व्हे क्र.११५, हिस्सा क्र.२, सर्व्हे क्र.११५, हिस्सा क्र.३, सर्व्हे क्र.११५, हिस्सा क्र.४, सर्व्हे क्र.११६, हिस्सा क्र.१/अ, सर्व्हे क्र.११६, हिस्सा क्र.१/अ/२, सर्व्हे क्र.११६, हिस्सा क्र.१/अ/३, सर्व्हे क्र.११६, हिस्सा क्र.१/अ/४, सर्व्हे क्र.११६, हिस्सा क्र.१/अ/५, सर्व्हे क्र.११७, हिस्सा क्र.१/अ/१, सर्व्हे क्र.११७, हिस्सा क्र.१/अ/२, सर्व्हे क्र.११७, हिस्सा क्र.१/अ/३, सर्व्हे क्र.११७, हिस्सा क्र.१/अ/५, सर्व्हे क्र.११७, हिस्सा क्र.१/अ/६, सर्व्हे क्र.११७, हिस्सा क्र.३, सर्व्हे क्र.११७, हिस्सा क्र.५/क, सर्व्हे क्र.११८, हिस्सा क्र.२/अ, सर्व्हे क्र.११८, हिस्सा क्र.२/ब इत्यादी मिळकती आहेत.

३. अर्जदार क्र.३ यांनी त्यांचे साक्ष शपथपत्र निशाणी क्र.११ अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यामध्ये अर्जात सांगितलेल्या बाबी नमुद

केल्या आहेत. अर्जदार यांनी अभिलेखावर यादी निशाणी क्र.४ अन्वये मयत कमल महावीरप्रसाद मोरारका यांचे मृत्यू प्रमाणपत्र, अर्जदार क्र.१ व ३ यांच्या आधारकार्डची प्रत, अर्जदार क्र.२ च्या पॅनकार्डची प्रत, सातबारा उताऱ्यांच्या प्रती, मयत कमल महावीरप्रसाद मोरारका यांच्या आधारकार्डची प्रत, ८अ उताऱ्याची प्रत, मयत बेलाबाई महावीरप्रसाद मोरारका यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत, अर्जदार क्र.२ यांच्या पंजीयन प्रमाणपत्राची प्रत, रेशनकार्डची प्रत अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार यांनी निशाणी क्र.१२ अन्वये पुरावा बंद पुरशीस दाखल केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाबाबत 'दैनिक ग्लोबल टाईम्स' या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस दिनांक ३१/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. न्यायालयीन बेलीफ मार्फत केलेला जाहीरनामा व त्याचा अहवाल, दवंडीपावती निशाणी क्र.८ वर आहे. प्रस्तुत अर्जाला दिलेल्या मुदतीत ते आजतागायत कोणीही हरकत घेतलेली नाही.

५. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदार हे मयत कमल महावीरप्रसाद मोरारका यांचे कायदेशीर वारस आहेत.

६. वरील परिस्थिती पाहता असे म्हणावे लागेल की, या प्रकरणामध्ये अर्जदार हे मयत कमल महावीरप्रसाद मोरारका यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. करीता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. अर्जदार क्र.१ भारती कमल मोरारका, अर्जदार क्र.२ समृध्दी जाटीया उर्फ समृध्दी कमल मोरारका व अर्जदार क्र.३ प्रगती मुंध्रा

उर्फ प्रगती कमल मोरारका हे मयत कमल महावीरप्रसाद मोरारका यांचे कायदेशीर वारस आहेत.

२. अर्जदार क्र.१ भारती कमल मोरारका, अर्जदार क्र.२ समृध्दी जाटीया उर्फ समृध्दी कमल मोरारका व अर्जदार क्र.३ प्रगती मुंध्रा उर्फ प्रगती कमल मोरारका यांना वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) नियमानुसार स्टॅम्प डयुटी आकारून निर्गमीत करण्यात यावे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR Date: 2026.03.24 17:38:31 +0530

पनवेल **(ए.एस. बडगुजर)**
दिनांक : २४/०३/२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पनवेल.